महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२-२२७९४१९६

क्रमांक : टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३ **दिनांक :१२.०१.२०२३**

प्रति,

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

विषयः- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राकरिता टी.ओ.डी. विनियमबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र.२५४७, दि.०५.०१.२०२३

महोदय,

दि.१०.१०.२०२२ रोजीचे शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २०(४) अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये बदल करून पुणे महानगरपालिका क्षेत्राकरिता TOD नियमावलीचे विनियम क्र.१४.२.१ लागू करण्यात आलेला आहे. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी लागू नसली तरीही, TOD संबंधित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमातील विनियम १४.२.१ पुणे महानगर प्रदेश प्राधिकरणास लागू करणेबाबत संदर्भिय पत्रान्वये शासनाचे मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे. या अनुषंगाने आपणांस पुढीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत.

नगर विकास विभागाने दि.०२.१२.२०२० रोजी राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे (काही अपवाद वगळता) आणि प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून ती दि.०३/१२/२०२० पासून अंमलात आली आहे. सदर नियमावली पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रास अद्याप लागू करण्यात आलेली नसली तरी, या क्षेत्राकरिताचा विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ अन्वये मंजूर झालेनंतर लागू होणार आहे. सद्यस्थितीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राकरिता दि.११.१२.२०१८ रोजी मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राकरिताच्या दि.११.१२.२०१८ रोजी मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.२१.८ नुसार The Regulations of PMC regarding Transit Oriented Development shall be applicable mutatis mutandis म्हणजेच पुणे महानगरपालिका क्षेत्राकरिता TOD बाबत लागू असलेले विनियम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रासाठी लागू राहतील, अशी तरतूद आहे.

उक्त एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूरीवेळी, त्या मधील विनियम क्र.१४.२.१ पुणे महानगरपालिका क्षेत्राकरिता Transit Oriented Development चे विनियम प्रलंबित ठेवण्यात आले होते. त्यानंतर संदर्भिय क्र.१ च्या दि.१०.१०.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये बदल करुन TOD विनियम लागू करण्यात आलेले आहे. तर विनियम १४.२.२ नुसार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राकरिता विनियम १४.२.१ मधील विनियम जशास-तसा लागु राहील, अशी तरतूद आहे.

सबब, पुणे महानगरपालिका क्षेत्राकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू असून त्यामधील विनियम क्र.१४.२.१ अंतर्गत पुणे महानगरपालिका क्षेत्राकरिता TOD चे नियम दि.१०.१०.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये लागू करण्यात आलेले आहे. त्याअर्थी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राकरिताच्या दि.११.१२.२०१८ रोजी मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.२१.८ नुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास आता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.१४.२.१ नुसार पुणे महानगरपालिका क्षेत्राकरिता लागू TOD विनियम, त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसहित, लागू राहतील.

आपला,

(प्रणव कर्पे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन